दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५ | अंक २४४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


**आजचा दिनविशेष**
१८९४ :– महात्मा गांधींनी नतालमधील भारतीय व्यापाऱ्यांविरुद्ध भेदभावाचा सामना करण्यासाठी नॅटल इंडियन काँग्रेस ची स्थापना केली.




# ट्रम्प यांची जिरवण्यासाठी भारत सरकारने चीनबद्दल घेतला खूप मोठा निर्णय, अमेरिकेच नुकसान

## भारत कुठल्या क्षेत्रात चीनवर अवलंबून?

भारतात मोबाइल, टीव्ही, कार आणि दुसरं इलेक्ट्रॉनिक सामान बनवण्यासाठी जे पाट्र्स लागतात त्यातलं 60 ते 65 टक्के सामान चीनमधून येतं. या सेक्टर्समध्ये भारत चीनवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. याच आठवड्यात चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी भारतात आले. यावेळी दोन्ही देशांनी आता उद्योग-व्यवसाय वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारकडून चिनी कंपन्यांना सांगण्यात आलय की, सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील नसलेल्या सेक्टर्समध्ये त्यांनी भारतीय कंपन्यांसोबत काम करावं.



भारत सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. चीनमधील बड्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना भारतात येण्याची परवानगी देण्यात येईल. यामुळे वीवो, ओप्पो, शाओमी, बीवाईडी आणि हायर सारख्या मोठ्या कंपन्यांचे चिनी बॉस आणि सीनियर अधिकाऱ्यांच भारतात येणं सोपं होईल. मागच्या पाच वर्षांपासून चीनच्या बिझनेस अधिकाऱ्यांना भारतात येण्यास बंदी होती. इकोनॉमिक टाइम्सच्या रिपोर्टनुसार, जे चिनी अधिकारी मॅनेजमेंट, सेल्स, मार्केटिंग, फायनान्स आणि HR शी संबंधित आहेत, त्यांना सहजतेने भारताची वीजा मिळू शकतो. 2020 साली भारत-चीनमध्ये सीमावादावरुन मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झालेला. त्यानंतर भारत सरकारने चिनी अधिकारी आणि बिझनेस प्रतिनिधींच्या भारतात येण्यावर कठोर प्रतिबंध घातले होते. इंजिनिअर आणि फॅक्टरी सेटअपच्या लोकांनाच भारतात येण्याची परवानगी होती. फक्त वीजाच नाही, चीनमधून होणाऱ्या गुंतवणूकीवर सुद्धा नियंत्रण आणलं होतं. नवीन नियम बनवण्यात आले. त्यानुसार, कुठल्याही चिनी कंपनीला भारतात गुंतवणूक करण्याआधी वेगवेगळ्या मंत्रालयांची परवानगी बंधनकारक करण्यात आलेली. पण आता डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे स्थिती बदलली आहे. दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरु झाली आहे. द्विपक्षीय संबंध हळूहळू सामान्य होत आहेत. “आमच्या लीडरशिप टीमला पुन्हा एकदा भारतात यायचं आहे. जर नवीन नियम लागू झाले, तर आम्हाला इथल्या बाजारपेठेचा अजून सखोल अभ्यास करता येईल” असं शाओमी इंडियाच्या प्रवक्त्याने म्हटलं. मागच्या काही वर्षांपासून वीवो इंडियाचे जेरोम चेन, ओप्पो इंडियाचे फिगो झांग आणि रियलमी इंडियाचे मायकल गुओ यांच्यासारखे सीनिअर अधिकारी भारतात आलेले नाहीत. हे सर्व लोक चीनमधूनच भारतातील व्यवसाय संभाळतायत. Carrier Midea जे भारतात एअर कंडीशनर विकतात त्यांचा एक अधिकारी मागच्या तीन वर्षांपासून वीजाच्या प्रतिक्षेत आहे. अजूनपर्यंत त्याला हिरवा कंदिल मिळालेला नाही.

# गणेशभक्तांना सरकारचं मोठं गिफ्ट, हजारो रुपये वाचणार, घेतला मोठा निर्णय!

महाराष्ट्रात दरवर्षी गणोशोत्सवाच्या काळात धूम असते. मुंबई, पुण्यात कामासाठी गेलेले चाकरमानी गणेशोत्सवाच्या काळात कोकणात आपापल्या गावी जात असतात. कोकणवासीयांना आपल्या गावी कोणत्याही अडचणीविना जाता यावे म्हणून सरकारकडून जादा बसेस आणि रेल्वे सोडल्या जातात. तर काही कोकणवासी आपापल्या खासगी वाहनांनी गावाकडे प्रयाण करत असतात. खासगी वाहनांतून प्रवास करताना मात्र कोकणवासींयाचे टोलमुळे हजारो रुपये जातात. हीच बाब लक्षात घेऊन राज्य सरकारने मोठा निर्णय घेतलाआहे. सरकारने गणेशोत्सवाच्या काळात टोलमाफी करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. राज्य सरकारकडून टोलमाफीची घोषणा यंदाच्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना मोठा दिलासा मिळाला आहे. सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी 23 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर 2025 या कालावधीत मुंबई-बेंगळूरु राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर टोलमाफी जाहीर केली आहे. ही सवलत कोकणात जाणाऱ्या सर्व खासगी वाहनांना आणि एसटी बसेसना लागू असणार आहे. टोलमाफीसाठी असणार विशेष पास या सवलतीसाठी “गणेशोत्सव 2025 – कोकण दर्शन” नावाचे विशेष टोलमाफी पास उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या पासवर वाहन क्रमांक आणि वाहन मालकाची माहिती नोंदवली जाईल. हे पास प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस आणि वाहतूक विभागाकडे उपलब्ध असतील. परतीच्या प्रवासासाठीही हेच पास वैध राहील. या निर्णयामुळे कोकणातील गणेशोत्सव साजरा करण्यासाठी गावी जाणाऱ्या लाखो गणेशभक्तांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. दरवर्षी गणेशोत्सवात कोकणात मोठ्या संख्येने जात असतात. या टोलमाफीमुळे त्यांचा प्रवास अधिक सुलभ आणि खर्चात बचत होणार आहे. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गणेशोत्सवाच्या काळात घेतलेल्या या निर्णयामुळे कोकणातील गणेशभक्तांच्या उत्साहात निश्चितच भर पडणार आहे.

# कुठे रस्ते पाण्याखाली, कुठे नागरिकांचे स्थलांतर

गेल्या चार दिवसांपासून मुंबईसह महाराष्ट्रात सातत्याने पडणाऱ्या पावसाने आता उसंत घेतली आहे. यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र अद्याप महाराष्ट्रात काही ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे काही जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे. राज्यात संततधार पडणाऱ्या पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहत आहेत. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुंबई जवळील वसई-विरार शहरात ४८ तासांनंतरही अनेक भागांत पाणी साचले आहे. तसेच या ठिकाणच्या ४० सोसायटी गेल्या 3 दिवसांपासून पाण्याखाली आहे विरार शहरात गेल्या ४८ तासांपासून अनेक रस्ते पाण्याखाली आहेत. विरार स्टेशन ते बोळींज रस्त्यावर एक ते दोन फुटांपर्यंत पाणी जमा झाले आहे. यामुळे कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांना ट्रॅक्टरमधून प्रवास करावा लागत आहे. तर सर्वात वाईट परिस्थिती युनिटेक कॉम्प्लेक्समध्ये आहे. या ठिकाणच्या ४० सोसायट्या गेल्या आठ दिवसांपासून पाण्याखाली आहेत. तळमजल्यावर गुडघ्यापर्यंत पाणी साचले आहे. ज्यामुळे ५०० हून अधिक कुटुंबांना आपली घरे सोडून नातेवाईकांकडे किंवा मित्रांकडे राहावे लागले आहे. एकेकाळी गजबजलेला हा परिसर आता पूर्णपणे शांत झाला असून, सर्वत्र फक्त पाणीच दिसत आहे.

# बाप्पाच नाही, पुजारी, स्वयंसेवक, स्वयंपाकी आणि सुरक्षा रक्षकांचाही विमा...

सर्वांच्या लाडक्या गणरायाचे आगमन होण्यास आता अवघे काहीच दिवस उरले असून देशभरात गणेशोत्सवाचा उत्साह जाणवक आहे. यंदा 27 ऑगस्टला बाप्पा अनेकांच्या घरी विराजमान होणार आहेत. महाराष्ट्रात विशेषत: मुंबईत साजारा होणा गणेशोत्सव हा जगभरात प्रसिद्धआहे. मुंबईतील अनेक गणेशमूर्तीं अद्वितीय असतात, त्यांन पाहण्यासाठी , आशीर्वाद घेण्यासाठी लांबूनही लोक येत असतात. मुंबईतील गौड सारस्वत ब्राह्मण मंडळ (GSB सेवा मंडळ) सर्वात भव्य आणि महागडा गणपती मंडप उभारतं. यावेळीही GSB मंडळ सर्वात श्रीमंत गणपती स्थापन करणार आहे. विशेष म्हणजे या वर्षी, जीएसबी मंडळाने त्यांच्या मंडपासाठी 474.4 कोटी रुपयांचे विक्रमी विमा कव्हर घेतलं आहे. गेल्या वेळी, 400.8 कोटी रुपयांचा विमा घेण्यात आला होता. यावर्षी विम्याच्या रकमेत वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे गणपती मूर्तीला अर्पण केलेल्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांची वाढती किंमत आणि सेवकांच्या संख्येत झालेली वाढ. न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनीने मंडळाला हे विमा कवच प्रदान केले आहे. या पॉलिसीमध्ये ऑल रिस्क कव्हर, स्टँडर्ड फायर (आग) आणि स्पेशल पेरिल पॉलिसी (भूकंपाच्या जोखमीसह), सार्वजनिक दायित्व आणि नोकरांसाठी वैयक्तिक अपघात कव्हर हे समाविष्ट आहे. 474.4 कोटी रुपयांच्या या विम्याचा सर्वात मोठा हिस्सा 375 कोटी रुपयांचा आहे जो चाकर, स्वयंपाकी, गद्दीदार, चप्पल स्टॉल कामगार, वॉलेट पार्किंग कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचारी यासारख्या सेवकांच्या वैयक्तिक अपघात विम्यासाठी आहे. त्यानंतर 67 कोटी रुपयांचा विमा आहे, आहे ज्यामध्ये सोने-चांदीचे दागिने आणि इतर जोखीम समाविष्ट आहेत. याशिवाय, मंडळाने 30 कोटींचे सार्वजनिक दायित्व कव्हर आणि 2 स्टँडर्ड फायरन आणि स्पेशल पेरिल पॉलिसी (विशेष संकट धोरण) देखील घेतले आहे.

# तेजेराव शंकरराव पाटील सिरसाट यांचे निधन

नांदेडप्रतिनिधी:बालाजीसिरसाट
नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिक माजी पोलीस पाटील तेजेराव शंकरराव पाटील सिरसाट वय ९० वर्ष यांचे दि.२२-ऑगस्ट रोजी पहाटे ४ : ३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.२२ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता जन्मभूमी उमरा येथे अंत्यविधी करण्यात येणार आहेत.



त्यांचे पश्चात- पत्नी, पाच मुले, एक मुलगी, सुना, नातू ,पणतू असा मोठा परिवार आहे.ते आनंदराव सिरसाट (पोलीस पाटील) भगवानराव सिरसाट, दादाराव सिरसाट (शिक्षण विस्तार अधिकारी) गणेश सिरसाट (शिक्षक) हणमंत सिरसाट यांचे वडील होत.

# त्या रिपोर्टने धनंजय मुंडेंचं टेन्शन वाढवलं, नवे आदेश

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर जे आरोप केले होते, त्यावर आज महत्त्वाची सुनावणी लोकायुक्तांकडे पार पडली आहे. ऑनलाईन सुनावणी पार पडली. या सुनावणीनंतर अंजली दमानिया यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. आज अतिशय महत्त्वाची सुनावणी पार पडली आणि यामध्ये अनेक महत्त्वाच्या गोष्टी मांडल्या गेल्या, असं म्हटलं गेलं की कृषी घोटाळ्या संदर्भातील ज्या पीआयएल होत्या, त्याचा संदर्भ देताना म्हटलं गेलं की, त्या पीआयएल मुंबई हाय कोर्टानं उडवल्या आहेत. पण त्यानंतर मी लोकायुक्तांना अतिशय गंभीर अशी माहिती दिली, ज्यामध्ये भ्रष्टाचार किती मोठ्याप्रमाणत झाला आहे, हे सांगितलं. एवढंच नाही तर व्ही राधा ज्या कृषी विभागाच्या सेक्रेटरी होत्या, त्यांनी एक गंभीर रिपोर्ट सबमिट केला होता. तो रिपोर्ट त्यांनी तेव्हाचे मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे दिला, तो रिपोर्ट गायब आहे. याची जेव्हा मी माहिती दिली, तेव्हा लोकायुक्तांना अतिशय धक्का बसला. त्यांनी ते रिकन्फर्म केलं, तेव्हा त्यांना कळालं खरच हा रिपोर्ट गायब आहे. तेव्हा त्यांनी धनंजय मुंडे यांच्या वकिलाला सांगितलं आहे की या रिपोर्टची फाईल त्यांनी पुन्हा कृषी विभागाकडे द्यावी, आता या प्रकरणाची पुढची सुनावणी 13 ऑक्टोबरला ठेवण्यात आली आहे, असं यावर बोलताना दमानिया यांनी माहिती दिली, दरम्यान या रिपोर्टमुळे आता धनंजय मुंडे यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

# तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये गॅस गळती,

तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. कंपनीत गॅस गळती झाल्यानं चार कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला आहे, तर दोन जण बेशुद्ध आहेत, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमधील मेडली फार्मासिटीकल कंपनीमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला आहे, तारापूर औद्योगिक वसाहतीमधील प्लॉट नंबर एफ 13 मध्ये ही कंपनी आहे. आज दुपारी अडीच ते तीन दरम्यान ही घटना घडली आहे. घटनेबाबत अधिक माहिती अशी की, पालघर जिल्ह्यातल्या तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये ही दुर्घटना घडली आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमधील प्लॉट नंबर एफ 13 मध्ये मेडली फार्मासिटीकल कंपनी आहे, या कंपनीमध्ये ही दुर्घटना घडली. वायू गळतीमुळे सहा कामगार बेशुद्ध झाले होते, त्यातील चार जणांचा गुदमरून मृत्यू झाला आहे, तर दोन जणांना तातडीनं येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं, सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आज दुपारी अडीच ते तीन वाजेदरम्यान ही घटना घडली आहे, दरम्यान हा अपघात नेमका कसा झाला, वायु गळतीचं नेमकं कारण काय आहे? हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेलं नाहीये.

# राहुल गिरी यांचा होणार राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने गौरव

## 23 ऑगस्ट रोजी लातूर येथे पुरस्काराचे वितरण ,

बीड प्रतिनिधी ,अंकुश गवळी
बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेले राहुल गिरी हे आपल्या भाषण कौशल्याच्या बळावर सबंध महाराष्ट्राला परिचित आहेत.अत्यंत कमी वयात त्यांनी आपली अनोखी छाप महाराष्ट्रभर उमटवली आहे.त्यांच्या मुखातून बाहेर पडणारे पहाडी शब्द आणि त्या प्रत्येक शब्दातून प्रवाहित होणारा गहन अर्थ ऐकणा-या प्रत्येकावर राहुल गिरी यांचा प्रभाव पाडल्याशिवाय राहत नाही.आपल्या कमी वयात बीड जिल्ह्याचा नावलौकिक वाढवणाऱ्या या तरुण युवकाने आजतागायत अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत, त्यातच गोसावी समाज प्रतिष्ठान,लातूर च्या वतीने राहुल गिरी यांना यावर्षीचा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता लातूर येथील, ब्लड बँक सभागृह,गांधी मैदान येथे अत्यंत दिमाखदार सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. अत्यंत सामान्य परिस्थितीतून बीड जिल्ह्याच्या ग्रामीण मातीत घडून पुढे आपल्या शैक्षणिक गुणवत्तेच्या बळावर पुणे विद्यापीठातून अ + श्रेणीतून उच्च शिक्षण पूर्ण करत आज मराठवाड्याच्या दुष्काळा संबंधित विषयावर पीएचडी करत असलेल्या राहुल गिरी यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनात जवळपास ४०० वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांची पारितोषिके मिळवली आहेत. राष्ट्रीय हिंदी भाषण प्रतियोगितेत महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांक मिळवणारा हा तरुण महाराष्ट्र राज्याचा प्रतिनिधी म्हणून संसद भवन दिल्ली येथे आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करायला उपस्थित राहिला तेव्हा तर सबंध महाराष्ट्राचा माथा अभिमानाने उन्नत झाला होता. आजमितीला राज्यभर दररोज अनेक व्याख्यानांतून प्रबोधनाचे मौलिक कार्य राहुल गिरी पार पाडत आहेत.अत्यंत कमी वयात महाराष्ट्रभर आपला नावलौकिक मिळवून बीड जिल्ह्याच्या या भूमिपुत्राने आपले वक्तृत्व कौशल्य आणि स्वभाववैशिष्ट्ये यांमुळे अत्यंत दांडगा जनसंपर्क जमवला असून बीड वासियांची मान अभिमानाने उंचावली आहे. राज्यातल्या जवळपास सर्व प्रमुख व्याख्यानमाला आणि उंचीच्या कार्यक्रमांत राहुल गिरी यांचे विचार श्रवण करायला जमणारी गर्दी त्यांचे



नावलौकिक दर्शवणारी आहे गोसावी समाज प्रतिष्ठान,लातूर च्या वतीने राहुल गिरी यांना मिळत असलेल्या राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने त्यांच्या गौरवात अधिक भर घातली आहे. दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता लातूर येथील, ब्लड बँक सभागृह,गांधी मैदान येथे संपन्न होत असलेल्या या पुरस्कार वितरणासाठी विविध स्तरांतून राहुल गिरी यांच्यावर शुभेच्छा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर



संपादकीय

## आजच्या युगातील माफक गरजा हाच खरा समाधानाचा मार्ग

**लेख संजय पाटील, एस्सेनेट टेक्नॉलॉजीज, नाशिक**

मानवी जीवनात परिस्थिती ही कायम बदलत असते. कधी सुख, कधी दुःख, कधी समृद्धी तर कधी टंचाई, हे सर्व अनुभव प्रत्येकाला घ्यावे लागतात. परिस्थिती आपल्यावर कितीही कठीण आली तरी माणसाने आपल्या मनाला खंबीर ठेवणे अत्यावश्यक आहे. कारण सुख-दुःख हे दोन्ही जीवनाचे दोन टप्पे आहेत. त्याकडे आपण पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असेल, तर आपण अडचणीतूनही मार्ग काढू शकतो. याच ठिकाणी समाधानाची वृत्ती माणसाला खरी ताकद देते. हा सुविचार आपल्याला शिकवतो की गरजा माफक असल्या तर मनुष्य कधीही अपूर्ण राहात नाही. आजच्या आधुनिक युगात माणसाच्या इच्छा आणि अपेक्षा दिवसेंदिवस वाढत आहेत. पण ज्यांनी आपल्या गरजांना मर्यादा घातल्या आहेत, त्यांचे जीवन नेहमी आनंदी राहते. कारण कमी साधनांतही ते सुख शोधू शकतात. मोठ्या महालात राहणारा माणूसही असमाधानी असू शकतो, तर लहानशा झोपडीत राहणारा कुटुंबवत्सल शेतकरी आनंदाने जीवन जगू शकतो. समाधानाची वृत्ती ही केवळ आर्थिक बाबींशी संबंधित नसते. ती मनाच्या स्थितीशी निगडीत असते. कमी पगारात काम करणारा एक शिक्षक जर आपल्या कार्यात आनंद मानत असेल, तर तो अधिक श्रीमंत व्यापाऱ्यापेक्षा सुखी ठरतो. कारण खरे सुख हे पैशात नसून समाधानात असते. परिस्थिती प्रतिकूल असली तरी मन समाधानात असेल तर जीवन आनंदी होते.

जगण्याच्या शर्यतीत लोक सतत इतरांशी तुलना करत असतात. 'त्याच्याकडे काय आहे आणि माझ्याकडे काय नाही' या विचाराने असंतोष वाढतो. अशा वेळी हा सुविचार आपल्याला आठवण करून देतो की, जे आपल्या जवळ आहे ते पुरेसे आहे. ही वृत्ती अंगीकारली की, ईर्षा, मत्सर आणि तणाव या गोष्टी आपोआप दूर होतात. शेतकरी हा याचा उत्तम आदर्श आहे. पाऊस आला नाही, पीक नीट झाले नाही तरी तो पुन्हा उभा राहतो. कारण त्याला माहीत असते की जीवनात चढ-उतार येणारच. ही मानसिकता त्याला खंबीर ठेवते. परिस्थिती काहीही असो, तो आपल्या कुटुंबासाठी कष्ट करत राहतो. त्याला समाधान असते की तो परिश्रम करतो आहे आणि उद्या चांगले दिवस येतील. आधुनिक समाजात भौतिक सुखसोयींची चढाओढ चालली आहे. पण या धावपळीत मानसिक शांती हरवली आहे. कितीही पैसा, कितीही गाड्या-बंगले मिळाले तरी मनाची तहान भागलेली नाही. म्हणूनच समाधानाची वृत्ती अत्यावश्यक आहे. कारण मन शांत असेल तरच खरी श्रीमंती अनुभवता येते. जीवनात आपण परिस्थिती निवडू शकत नाही, पण तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन निवडू शकतो. जर परिस्थिती कठीण असेल आणि आपण तिला स्वीकारून पुढे जाण्याचा प्रयत्न केला तर जीवन अधिक सोपे होते. पण जर आपण तक्रार करत बसलो तर असंतोष आणि दुःख वाढते. त्यामुळे प्रत्येक वेळी परिस्थितीकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. कुटुंबात किंवा समाजात जेव्हा अडचणी येतात तेव्हा समाधानाची वृत्ती खूप उपयुक्त ठरते. कधी कमी साधनं असतात, कधी जास्त. पण जर माणसाने एकत्र राहून थोड्यांत समाधान मानले, तर त्या कुटुंबात कायम आनंद राहतो. म्हणूनच 'थोडक्यात समाधान मानणारा माणूस नेहमी सुखी असतो' हे सत्य आहे. या सुविचारातून आपल्याला एक महत्वाची गोष्ट समजते, जीवन हे स्पर्धा नाही, तर प्रवास आहे. प्रवासात सुख-दुःख, सोय-टंचाई, चांगले-वाईट क्षण हे येणारच. जर आपण प्रत्येक क्षणाचा आस्वाद घेतला तर प्रवास सुंदर होतो. पण जर सतत पुढचं ध्येय डोळ्यासमोर ठेवून वर्तमानाकडे दुर्लक्ष केलं तर आनंद हरवतो. संतांनी नेहमीच समाधानावर भर दिला आहे. तुकाराम महाराज म्हणतात, 'संतोषी सुखी माणूस.' कारण संतोष हीच खरी संपत्ती आहे. समाधानाशिवाय मोठमोठे राजे-महाराजेसुद्धा दुःखी झालेले दिसतात. पण थोड्या साधनांत आनंद मानणारे संत आजही जगाला प्रेरणा देतात. आजच्या तरुण पिढीला या सुविचाराचा विशेष उपयोग होऊ शकतो. करिअर, पैसा, प्रतिष्ठा या सर्व गोष्टींची धडपड करताना मनःशांती गमावली जाते. जर तरुणाईने आपल्या क्षमतांनुसार प्रयत्न करताना समाधानाची वृत्ती ठेवली, तर ते अधिक यशस्वी आणि आनंदी होऊ शकतात. परिस्थिती कधी कधी आपल्यावर नियंत्रण ठेवते, पण आपली वृत्ती मात्र आपल्याच हाती असते. म्हणूनच परिस्थिती काहीही असो, मन समाधानात असेल तर आपण संकटांना तोंड देऊ शकतो. खरे तर परिस्थितीपेक्षा मनोवृत्तीच माणसाला यश-अपयश ठरवते.

समाधान ही फक्त व्यक्तीगत गोष्ट नाही, तर समाजासाठीही उपयुक्त आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करा-संभाजी ब्रिगेड

## धरणे आंदोलनातुन थाली नाद करत प्रशासनाचे लक्षवेधले

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : शेतकरी कर्जमाफी,उस, कांदा,कापुस व दुध दर,मराठा, धनगर व इतर आरक्षण, निवडणुका बॅलेट पेपरवर घेणे आणि अतिवृष्टी झाल्याने ओला दुष्काळ जाहीर करत शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ हेक्टरी ५० हजार नुकसान भरपाई तात्काळ जाहीर करून द्यावी आदि ज्वलंत विषयांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संभाजी ब्रिगेड च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर थाली नाद करत धरणे आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र निवडणुकी दरम्यान आपण शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन जनतेला दिले होते. ऊस, कांदा व इतर शेतमाल तसेच दुधाच्या दरात वाढ व मराठा, धनगर व इतर जात समुहाचे आरक्षण आदी प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे जनतेला आश्वाशित केले होते.आपण सत्तेवर आलात व मुख्यमंत्री झालात मात्र या गंभिर विषयांबाबत आपण चालढकल करत आहात.आज महाराष्ट्रातील संपुर्ण शेतकरी अत्यंत कठिण परस्थितीत असुन कर्जबाजारी झाला आहे. महाराष्ट्रात दर दिवशी सरासरी तीन शेतकरी कर्जाच्या विळख्याने आत्महत्या करीत आहेत, आपण निवडणुकीत कर्जमाफी बाबत आश्वाशित केल्याने तो मोठ्या अपेक्षेने याबाबत आपणाकडे आस लावुन बसला आहे. सरकारने तातडीने सरसकट शेतकरी कर्जमाफी करून बळीराजाला सुखी करावे. राज्यात मराठा, धनगर व इतर काही जात समुह आरक्षणाची मागणी करत असुन याबाबत समाजबांधव अत्यंत आक्रमक असुन त्यांच्या भावनाही अत्यंत तिव्र आहेत. सरकारमधील काही आपले प्रतिनिधी व जबाबदार मंत्री या संवेदनशील विषयावर विक्षिप्त विधाने करून वातावरण बिघडवत आहेत. जातीय तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न करत आहेत. राज्याचे प्रमुख म्हणुन आपण जबाबदारीने हा विषय निकाली काढावा. मराठा समाजाला आरक्षणाचा संवैधानिक हक्क म्हणजे ओबिसीत समावेश करावा मराठा,धनगर समाजाचा एस.टी.समावजश करावा ओबीसी व इतर असा जातीय संघर्ष व तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. महाराष्ट्रातील शेतकरी मुख्यतः उस,कापुस,कांदा, सोयाबीन, धान व दुध व्यवसाय यावर मोठ्या प्रमाणात गुजरान करत आहे मात्र याबाबत सरकार म्हणून आपण अत्यंत उदासीन आहात. उसाला सहकारी अथवा खाजगी कारखानदार एफ आर पी प्रमाणे दर देत नाही, तत्काळ पेमेंट देत नाहीत. तसेच कारखान्यावरील वजन काटे सदोष आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. कारखानदार कोट्यवधीची चोरी करत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फसवत आहेत. महाराष्ट्रात कडक कायदा करून उसाला एफ आर पी प्रमाणे दर देऊन सात दिवसांत पेमेंट देण्याचे आदेशित करावे. प्रत्येक कारखान्याचा वजन काटा



पारदर्शक असावा याबाबत कायदा करावा. दुधाला दुधउत्पादनाच्या खर्चावर आधारीत दर दिला जात नसुन यामागे फार मोठे षडयंत्र असून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात भेसळीच दुध अल्पदरात तयार करून विकले जाते व प्रत्यक्षात दुधउत्पादकांना कमी दर देऊन दुध उत्पादन वाढणार नाही याची काळजी या षडयंत्राद्वारें भेसळखोर घेत आहेत. यासाठी कर्तव्यदक्ष यंत्रनेमार्फत या भेसळखोरावर कारवाई करावी. दुध भेसळीबाबत कठोर पावले उचलावीत. भेसळ बंद करून दुधाला ७० रुपये दर जाहीर करावा. राज्यात प्रचंड अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले असल्याने राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून पंचनाम्याचे नाटकं न करता शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५०,००० रुपये प्रमाणे नुकसान भरपाई द्यावी तसेच कांदा, सोयाबीन, कापुस व इतर शेतमाला बाबत तात्काळ उत्पादन खर्चाचा विचार करून हमीभाव जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. येणाऱ्या काळात महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत या पृष्ठभूमीवर या निवडणुका बॅलेट पेपर वरच घेण्यात याव्यात, निवडणुक आयोगाने व्हि व्हि पॅट लावणार नसल्याचे जाहीर केले असुन, सध्या देशभर इव्हिएम बाबत संशयाचे वातावरण असल्याने बॅलेट पेपर वरच या निवडणुका घेऊन सरकारने पारदर्शक कारभार स्पष्ट करावा. वरील निवेदन व त्यातील गंभीर मुद्द्यानुसार आपणास विनंती की याबाबत आपण तत्काळ निर्णय घ्यावा. या संदर्भाने संभाजी ब्रिगेड आपले लक्ष वेधण्यासाठी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर थाली नाद आंदोलन करत धरणे धरून महत्त्वाच्या विषयावर लक्ष वेधले आहे यावेळी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले यावेळी संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, विभागीय कार्याध्यक्ष भगवान कदम, लोकसभा अध्यक्ष परमेश्वर पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, जिल्हाध्यक्ष कमलेश कदम, जिल्हाध्यक्ष जेजेराव शिंदे, महानगर अध्यक्ष अशोक कदम, अंकुश कोल्हे, गजानन इंगोले,दिलीप दळवी, अविनाश शिंदे,किरण वानखेडे, स्वप्नील शिंदे, ज्ञानेश्वर हंगरगे,शरद सोळंके, प्रद्युम्न जाधव, बालाजी देशमुख, पुंडलिक शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, नितीन कोकाटे,सुरज आलेगावकर, संतोष कदम,सतीष व्यवहारे, राम मरळककर,कुंडलिक शिंदे, ज्ञानेश्वर पवार,प्रदीप गुबरे,विकास लुंगारे ,धुराजी कदम, संकेत इंगोले संतोष आसर्जनकर,नंदु कदम आदिसह अनेकांची उपस्थिती होती.

# मराठा समाजातील दैदिप्यमान यश प्राप्त करणाऱ्या प्रज्ञा प्रतिभावंतांचा 7-सप्टेंबर रोजी गौरव सोहळा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघ,जिजाऊ ब्रिगेड,संभाजी ब्रिगेड व ३३ कक्षाच्या वतीने मराठा समाजातील दैदिप्यमान यश प्राप्त करणाऱ्या प्रज्ञा प्रतिभावंतांचा गौरव सोहळा ७-सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता कै.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

या गौरव सोहळ्यामध्ये मराठा समाजातील कला, क्रिडा, सांस्कृतिक, साहित्यीक, कृषी व शासनाने सन्मानित केलेल्या तसेच शिष्यवृत्तीधारक, प्रज्ञा शोध, नवोदय प्रवेशधारक, इयत्ता दहावीमध्ये ८० व बारावीमध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त तसेच एमबीबीएसमध्ये प्रवेश घेतलेले, आयआयटी, प्रवेश धारक पदवीसाठी ८० टक्के, पदव्युत्तर पदवी ८० टक्के, सेट-नेट, पीएचडी धारक, एमपीएससी व युपीएससी परिक्षेत यावर्षी निवड झालेल्या या सर्व गुणवंतानी गुणपत्रकेची झेरॉक्स प्रत, प्रवेशाची झेरॉक्स प्रत ६-सप्टेंबरपर्यंत यशवंतराव चव्हाण मराठा मुलांचे वस्तीग्रह नवा मोंढा नांदेड मराठा सेवा संघ मुलींचे वस्तीगृह नवा मोंढा नांदेड खेडकर स्पोर्ट्स दुकान व्हीआयपी रोड नांदेड शिवार पुस्तकालय वर्कशॉप रोड नांदेड या ठिकाणी झेरॉक्स प्रति दिलेल्या पत्त्यावर ६-सप्टेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत जमा करुन नोंदणी करावी.असे आवाहन मराठा सेवा संघ जिजाऊ ब्रिगेड,संभाजी ब्रिगेड व ३३ कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड जिल्ह्यात पतसंस्थांसाठी सायबर सुरक्षा आणि कर्जवसुलीवर विशेष प्रशिक्षण....

बीड (प्रतिनिधी) आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित पुणे आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण बिगरशेती सेवक सहकारी पतसंस्थांसाठी एका विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रशिक्षण 20 ऑगस्ट 2025 रोजी तुळशी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. धनंजय डोईफोडे, सहनिबंधक (सेवानिवृत्त) तथा राज्य समन्वयक, एमसीडीसी पुणे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. सतीश तोटावार, जिल्हा उपनिबंधक, बीड हे उपस्थित होते. याप्रसंगी श्री. सचिन घोडके, उपनिबंधक, बीड; प्राचार्य निकाळजे सर; आणि जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे सहायक निबंधक व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील 250 ते 300 प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख मार्गदर्शक श्री. धनंजय डोईफोडे यांनी केले, तर अध्यक्षीय भाषणात श्री. सतीश तोटावार यांनी पतसंस्थांना मार्गदर्शन केले.पहिल्या सत्रात श्री. संदीप आराख (एपीआय) आणि श्री. पंचम वडमारे (सायबर विभाग, बीड) यांनी सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी सायबर



फसवणूक, डिजिटल अटक, घोटाळे, क्रिप्टोकरन्सी आणि अँटी मनी लॉन्ड्रिंग यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर सविस्तर माहिती देत पतसंस्थांनी कोणती काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले. दुसरे व्याख्यान प्रियदर्शिनी नागरी सहकारी बँक, जालना येथील मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सचिन वाणी यांनी ठेव संकलन व निधी व्यवस्थापन या विषयावर दिले.दुपारच्या सत्रात श्री. सचिदानंद नाईकवाडी (उपनिबंधक, सहकारी संस्था, सेवानिवृत्त, पुणे) यांनी थकीत कर्ज वसुली प्रक्रियेसाठी घ्यावयाच्या दक्षता व कायदेशीर तरतुदींबद्दल मार्गदर्शन केले. शेवटच्या व्याख्यानात ॲडव्होकेट श्री. महेंद्र खरात, पुणे यांनी आर्थिक साक्षरता व नियामक मंडळाच्या तरतुदी या विषयावर सखोल माहिती दिली.

सर्व वक्त्यांनी उपस्थितांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींनीही या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सिद्धेश्वर सांगुळे यांनी केले, तर प्रशिक्षण समन्वयक म्हणून श्री. मयूर शेळके यांनी जबाबदारी पार पाडली. सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आणि श्री. पवन पाटील यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मराठा मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या; खा.सोनवणे भेटले गडकरींना

## मराठा समाजाच्या मोर्चासाठी दिले MSRDC आणि NHAI ला पत्र,

बीड: मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई मोर्चा निमित्त बीड जिल्ह्यासह राज्यभरातून मुंबईकडे लाखो वाहने येणार आहेत. या वाहनांमधून युवक, शेतकरी, कष्टकरी येणार असून त्यांच्यावर आर्थीक भार पडू नये, यासाठी त्यांच्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना पत्र दिले असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवूनही मागणी केली आहे. मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या मुंबई येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी बीडसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने नागरिक मुंबईकडे प्रवास करणार आहेत.या प्रवासासाठी हजारो वाहने मुंबईकडे येणार असून त्यामुळे मार्गावरील टोल नाक्यांवर मोठी गर्दी होणार आहे तसेच प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार येणार आहे. शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिक स्वयंस्फूर्तपणे या आंदोलनात सहभागी होत असल्यामुळे त्यांच्यावर जादा खर्च पडू नये, यासाठी त्या कालावधीत मुंबईकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, या निर्णयामुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल व वाहतूक व्यवस्थापन सुलभ होईल म्हणून या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत, असे म्हटले आहे. मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण,



कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना पत्र दिल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची देखील भेट घेतली. यावेळी मराठा समाजाच्या मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफीचा निर्णय घेण्यात यावा, तसे आदेश आपण द्यावेत, अशी मागणीही केली. यावेळी दोघात टोलमाफिच्या विषयावर सकारात्मक चर्चा झाली आहे.

### समाजासाठी पत्र देणारे पहिले लोकप्रतिनिधी

राज्यात मराठा आरक्षण प्रश्नी वातावरण तापलेले आहे.दि.२९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन होत आहे. यासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या गरीब मराठा समाजावर आर्थीक भार पडू नये, यासाठी टोलमाफीचे पहिले पत्र केंद्रीय मंत्री तसेच MSRDC व NHAI यांना दिले आहे. असे पत्र देणारे खा.बजरंग सोनवणे हे पहिले लोकप्रतिनिधी आहेत.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## माणुसकी वारे वाहू द्या...



विचारांच्या मांदियाळी
भावनांचा हो कल्लोळ
डंख विषाचे मारुनी
करतात जाळपोळ...

माणूस म्हणून आपल्याला विकसित मेंदू लाभलेला आहे.पण,त्याचा वापर आपण कशासाठी करावा हेच आपल्याला समजत नाही.सतत मनात पापी विचार येतात. पुण्य आणि पाप कशाला म्हणायचे हा ही मोठा प्रश्न.ज्याने दुसऱ्याच्या/समोरच्या व्यक्तीच्या मनाला इजा होते,ज्याने वाईट कृत्य घडते ते पापी विचार.याच्या उलट ज्या कृतीने,बोलण्याने समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्याची एक किनार येते,ज्याने देशाचा,गावाचा फायदा होतो तो पुण्य विचार.

आपल्या भारतीयांची लोकसंख्या इतकी प्रचंड असताना आपल्याकडे इतर देशाच्या वाईट नजरा का जातात?त्यांची हिंमत कशी होती आपल्याला इजा पोहचण्याची? कारण काय तर आपल्यात एकी नाही.सतत एकमेकांचे पाय ओढण्यात आपण दंग असतो. इतरांना नावे ठेवले का आपण जणू खूप मोठे झालो? अशी आपली नियत? चमच्यांची संख्या तर अफाट वाढलेली आहे.जो तो स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांच्या खांद्यावर बंदूक ठेवून स्वतःला वाचवतो.कामे करायची नाही,फक्त लावालाव्या करायच्या इतकेच यांचे काम. इतरांसाठी खड्डे खोदणारे स्वतः ही कधी त्या खड्ड्यात पडतील हे ही समजणार नाही.हे चित्र बदलले पाहिजे,त्यातच देशाचे कल्याण आहे.जो तो फक्त स्वतःसाठी जगताना दिसतो ,पण त्याच्या मनात देशासाठी तळमळ बिल्कुल दिसत नाही.फक्त अन् फक्त स्वतः चे जीवन.

आपल्या आजुबाजूला अशा लोकांची भरती कमी नाही. ती वेळीच ओळखली पाहिजे आणि त्याची नांगी ठेचली पाहिजे. नाहीतर असले विंचू सतत आपल्याला डसणार.या गोष्टीचे त्यांना खूप समाधान मिळते.मानवाने मानवासंगे मानवा प्रमाणे वागावे हेच समजत नाही.माणुसकी पायदळी तुडविली जाते.यातच यांना मोठेपण वाटते.काय बोलू अन् काय नको,आपण खरच माणसं आहोत का? हेच त्यांना समजत नाही.जनावरे तरी प्रामाणिक असतात..पण,माणूस प्राणी सर्वात लबाड.सगळ्यांनी जाती वाटल्या,धर्म वाटले,गाव वाटले,रंग वाटले,देव देवता वाटले,आई बाप ही वाटतांना दिसत आहे चित्र.

कोणी एकमेकांच्या भावना समजून घ्यायलाच तयार नाही. माझ्याबाबतीत नाही झाले ना वाईट? मग ठीक?त्याचे,तिचे काही होवू दे मला काय त्याचे घेणे देणे नाही?पहा,एकविसावे शतक संपत आले तरी अशी आपली अवस्था. एकी जेव्हा सर्वत्र दिसेल तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण स्वतंत्र असू.आपण आपलेच वैरी आहोत.जेव्हा इंग्रज, डच,पोर्तुगीज,औरंगजेब भारतात आले तेव्हा त्यांच्याविरुद्ध का एकीने उभे राहिले नाही.म्हणून इतक्या वर्ष त्यांची चाकरी करत बसलो,विनाकारण किती तरी देशभक्त,क्रांतिकारक यांचे बळी गेले? आजचे तरुण राजकारणात उतरत नाही? त्यांनी उतरले पाहिजे..खुर्ची,पैशासाठी नाही तर..ही पोकळी,दरी मिटविण्यासाठी. गरीब श्रीमंत भेद मिटण्यासाठी.माणुसकी वारे वाहण्यासाठी. सुजलाम्,सुफलाम माझा भारत होण्यासाठी.तरुणांनी स्वतःस मोबाईल,मुलींच्या मागे फिरणे,नको ती व्यसने यातच जीवन बरबाद केलेले दिसते.त्यांच्या उच्च शिक्षणाचा काहीही उपयोग नाही.आता हे चित्र बदलले पाहिजे.अजूनही वेळ गेलेली नाही.बदला स्वतःस ,आपले विचार बदला,समानता अंगिकारून प्रगल्भ विचारांचे अनुसरण करा.

छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजी महाराज,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यासारख्या विभूती पुन्हा होणे शक्य नाही असे चित्र दिसते.प्रत्येक घरात एक तरी शिवबा,संभाजी,बाबासाहेबजी, अहिल्यादेवी जन्मले गरजेचे आहे. त्यांच्या विचारांचे पाईक होणे गरजेचे आहे.वेळ गेलेली नाही...बदल हा निसर्गाचा नियम आहे."निसर्ग ही साथ सोडत आहे". आपल्या या वागणुकीमुळे..त्यालाही समजते.

सौ.प्रतिमा अरुण काळे/खेमनर
निगडी प्राधिकरण,पुणे 44
मोबाईल नंबर: 8830654661
शिक्षिका,लेखिका,कवयित्री,निवेदिका,संपादिका,समीक्षक,पर्यावरण प्रेमी.



प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे उरण दि २१ गेली ५ ते ६ दिवस रायगड जिल्यातील उरण तालुक्यात व परिसरात जोरदार वादळ वारा व पाऊस सुरु आहे. वादळी वाऱ्यामुळे उरण तालुक्यात असलेल्या मोरा बंदरात आश्रयासाठी आलेल्या गुजराती मच्छीमार बोटीतून एक खलाशी बेपत्ता झाला आहे.भरतभाई डालकी (४४) असे या बेपत्ता खलाशाचे नाव आहे.गुजरात राज्यातील वेरावल येथील भरतभाई कचराभाई डरी यांच्या मालकीची भवानी गंगा नावाची मच्छीमार बोट वादळी हवामानाच्या इशाऱ्यानंतर सुरक्षिततेसाठी मोरा बंदरात नांगर टाकून विसावली होती. १९ ऑगस्ट २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मोरा बंदरात आलेल्या या मच्छीमार बोटींवर ६ खलाशी व एक तांडेल असे एकूण सात जण होते.पैकी भरतभाई डालकी हा खलाशी शौचालयाला गेला होता. बराच वेळ झाला तरी बोटीवर दिसून आला नसल्याने त्याचा शोध घेतला मात्र कुठेच आढळून आला नाही.त्यामुळे मोरा सागरी पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली असल्याची माहिती वपोनि सुर्यकांत कांबळे यांनी दिली.

दरम्यान याप्रकरणी पोलिस व सागरी सुरक्षा रक्षक दलाच्या सदस्यांना बेपत्ता खलाशाचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.तसेच गुजराती बोटीवरील खलाशी व तांडेल यांनाही सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे सुचना देण्यात आल्या असल्याची माहिती रायगड मत्स्यव्यवसाय विभागाचे सहआयुक्त संजय पाटील यांनी दिली.वारंवार मासेमारी बोट, प्रवाशी बोटीच्या दुर्घटना होत असल्यामुळे समुद्रातील प्रवास व व्यवहार अधिकच धोक्याचे झाल्याचे चित्र दिसत आहे.

# बीज भांडवल योजनेसाठी बेरोजगार युवक युवतींनी अर्ज सादर करावेत

बीड, दि.21 (जिमाका): विशेष घटक योजना (२०२५-२०२६ मध्ये साध्य झालेले लक्ष्य ८० लाभार्थी) स्वरूप:- प्रकल्प मर्यादा रु. ५००००/- पर्यंत.प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के पर्यंत अनुदान देण्यात येते व राहिलेली ५० टक्के रक्कम बँके मार्फत देण्यात येते. उदा. (२५ हजार अनुदान २५ हजार बँक रक्कम बँक कर्जावर बँकेच्या नियमा प्रमाणे व्याज आकारण्यात येते.

कर्जाची परतफेड सर्वसाधरणपणे ३ वर्षात करण्याची आहे. बियाणे भांडवल योजना (२०२५-२०२६ उदिष्ट ८० लाभार्थी स्वरुप प्रकल्प मर्यादाः ०५ लाखापर्यंत प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीजभांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ टक्के द.सा.द.शे. व्याज दराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. १०,०००/- चा समावेश आहे. बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज दर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवुन दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार तीन ते पाच वर्षाच्या आत करावी लागते. अर्जदारास ५ टक्के स्वतः चा सहभाग भरावयाचा आहे. थोडक्यात बँक रक्कम ७५ टक्के महामंडळ २० टक्के व अर्जदाराचा सहभाग ५ टक्के एकुण १०० टक्के mahadisha. mpbcdc.in या संकेतस्थळावर ऑनलाईन (Online) कर्ज मागणी अर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तरी इच्छुक अर्जदारांना महामंडळाकडून खालीलप्रमाणे अर्जदारांनी त्यांचे स्वतः चे (E-Mail) ई मेल अकाउंट वापरुन ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज करावा व अर्जाची मुळ प्रत व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जिल्हा कार्यालयात स्वतः सादर करावी. त्रयस्त व्यक्तीकडून अर्ज किंवा इतर वैधानिक दस्ताऐवज स्विकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी जिल्हा व्यवस्थापक महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळ मजला येथे संपर्क साधावा. असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक बीड यांनी प्रतिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

******

# जिल्हा क्रीडा पुरस्कार सन 2023-24 साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड, दि.21 (जिमाका): क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटु गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे, योगदानाचे मुल्यमापन होउन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे 2023-24 करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम जिल्हयातील 01 गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत खेळाडू (01 पुरूष 01 महिला व 01 दिव्यांग खेळाडू) असे एकुण 04 पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आहेत.

2022 नुसार सन 2023-24 च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दि. 01 जुलै 2023 ते 30 जून 2024 या कालावधीसाठी खेळाडूची मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.

अ) गुणवंत खेळाडू :-

खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व 05 (पाच वर्षापैकी 02 (दोन) वर्षे त्या जिल्हयाचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असावे.खेळाडूंची मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत राज्य राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमधील पुरस्कार वर्षाच्या लगतपूर्व 05 ( पाच वर्षातील राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वरिष्ठ, कनिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा, शालेय व केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धा मधील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेण्यात येईल यापैकी उत्कृष्ट ठरणाऱ्या 03 वर्षाच्या कामगिरीचा विचार गुणांकण कोष्ठकामध्ये करण्यात येईल. खेळाडूने स्पर्धांच्या मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सोबत सादर करणे आवश्यक आहे. खेळाडूंचा अर्ज अधिकृत जिल्हा संघटने मार्फत शिफारसीसह सादर करणे आवश्यक आहे.

अपवादात्मक परिस्थीतीत खेळाडू वैयक्तीकरित्या अर्ज सादर करू शकतील. एशियन गेम्स्, कॉमनवेल्थ गेम्स्, जागतीक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट). जागतीक चषक क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट), आशियाई अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट). राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट), युथ ऑलिंपीक गेम्स्, युथ कॉमनवेल्थ गेम्स्, युथ जागतिक आजिंक्यपद । युथ जागतिक चषक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत सहभागी खेळाडूस 2023-24 करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार थेट देण्यात येईल.

गुणवंत क्रीडा मार्गदर्शक :-

क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्र राज्यात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असले पाहिजे व त्याने पुरस्कार वितरीत करण्यात येणाऱ्या सन 2023-24 वर्षात वयाची 35 वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षात किमान वरीष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला (खेलो इंडिया) मधील राज्य ते राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदकविजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील.

नांघिक अथवा वैयक्तीक मान्यता प्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल खेळाडू अथवा राज्य / जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यंत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक पात्र असेल.

विहित नमुण्यातील अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. विहीत नमूण्यातील अर्ज कार्यालयाच्या फलकावर लावण्यात आलेला आहे. बीड जिल्हयातील पात्र असलेल्या मार्गदर्शक व क्रीडा पटुंनी उपरोक्त पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज दि. 30 ऑगस्ट 2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी, मो. 9604959678 जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीड अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# भव्य अमृत मेळाव्याचा तरुणांनी लाभ घेण्याचे आवाहन

बीड, दि.21 (जिमाका): माजलगाव येथे दि. 23 ऑगस्ट रोजी भव्य 'अमृत मेळावा'शिक्षण, कौशल्य आणि व्यवसाय संधींचा अद्वितीय संगम माजलगाव (जि. बीड) –महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने शनिवार, 23 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता वैष्णवी मंगल कार्यालय, गजानन मंदिर रोड, माजलगाव येथे भव्य 'अमृत मेळावा व परिसंवाद सत्राचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात ब्राह्मण, मारवाडी, आर्य वैश्य (कोमटी), गुजराती, राजपूत, माहेश्वरी, राजपुरोहित, सिंधी, बनिया, बंगाली, पाटीदार आदी खुल्या प्रवर्गातील समाजासाठी अमृत संस्थेच्या विविध शैक्षणिक, कौशल्य विकास आणि उद्योग उभारणीसाठीच्या योजनांची माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे. मेळाव्यात UPSC/MPSC पूर्व परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहन अर्थसहाय्य, IIT, IIM, AIIMS, IIIT सारख्या उच्च शिक्षण संस्थांसाठी सहाय्य, IGTR, CIPET, NIELIT, C-DAC यांसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांचे कौशल्य विकास कोर्सेस पूर्णपणे विनामूल्य, व्यक्तिमत्त्व विकासासाठी MKCL चा अमृत कलश कोर्स व किशोर विकास उपक्रम, तसेच तरुणांसाठी बेकरी, सुर्यमित्र,इम्पोर्ट-एक्सपोर्ट यांसारखी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. याशिवाय व्यवसाय कर्जावर व्याज परतावा या योजनांचा लाभही मिळणार आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) मार्फत अमृतच्या लाभार्थ्यांना मोफत स्वयंरोजगार प्रशिक्षण उपलब्ध होणार असून त्यासाठी नोंदणी व मार्गदर्शन या मेळाव्यात केले जाईल. याशिवाय लहानात लहान स्वदेशी उत्पादन व सेवा जगभर पोहोचविण्यासाठी "अमृत पेठ" या महत्वाकांक्षी उपक्रमाची माहिती व नोंदणीही या मेळाव्यात होणार आहे.या कार्यक्रमास अमृत संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रवीण पांडे, माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर व राज्य समन्वयक दीपक जोशी उपस्थित राहणार आहेत. हा मेळावा शिक्षणापासून व्यवसायापर्यंत आत्मनिर्भरतेकडे नेणारे एक भक्कम पाऊल ठरणार असून खुल्या प्रवर्गातील तरुणांसाठी ही सुवर्णसंधी आहे. समाजातील सर्व नागरिक व तरुणांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक विशाल अशोकराव जोशी यांनी केले आहे.

# पोळा सण: बैलांच्या ऋणानुबंधांचा कृतज्ञतेचा महोत्सव

. भारतीय संस्कृतीत सण हे केवळ आनंदाचे निमित्त नसतात , तर ते आपल्या जीवनशैलीशी , निसर्गाशी आणि संस्कृतीशी असलेल्या नात्यांची जाणीव करून देतात . अशा अनेक सणांपैकी पोळा हा एक असा सण आहे, जो आपल्या कृषीसंस्कृतीतील बैल या अत्यंत महत्त्वाच्या जीवावर केंद्रित आहे . पोळा म्हणजेच बैलपोळा — श्रावण महिन्यातील पिठोरी अमावास्येला साजरा होणारा सण — हा शेतकरी आणि बैल यांच्यातील ऋणानुबंधाचे प्रतिक आहे . वर्षभर न थकता शेतकऱ्याच्या शेतीसाठी राबणाऱ्या बैलांना कृतज्ञतेने नमविण्याचा आणि त्यांचा सन्मान करण्याचा हा दिवस असतो .

भारतात पोळा महाराष्ट्र , मध्य प्रदेश , छत्तीसगड , कर्नाटक या राज्यांत साजरा केला जातो . महाराष्ट्रात विशेषतः विदर्भ , मराठवाडा आणि खान्देश भागात या सणाला मोठं महत्त्व आहे. या दिवशी बैलांना आंघोळ घालून , त्यांच्या अंगाला हळद , तेल लावून, रंगीत रंगांनी सजवले जाते . गळ्यात माळा , घंटा , कवड्या , आणि पायात चांदीचे तोडे घातले जातात . शिंगांना रंग लावून ते उठून दिसतील अशी सजावट केली जाते . बैलांना जेवायला गोडधोड अन्न दिलं जात . संध्याकाळी गावातून बैलांची मिरवणूक काढली जाते . शेतकरी पारंपरिक वेशात , ढोल-ताशा , बॅन्ड , लेझीम यांच्या गजरात आपल्या बैलांसह सामील होतात . या मिरवणुकीत बैलांच्या सौंदर्यस्पर्धाही घेतल्या जातात .

पोळ्याच्या आदल्या दिवसापासूनच तयारी सुरू होते . शेतकरी बैलांची साधने जसे की जू , सोंटा , नांगर झाडून-पुसून रंगवतात . महिलावर्ग घरातील सजावट करतो . विशेष पारंपरिक जेवण बनवलं जात , ज्यात पुरणपोळी , कांदाभजी , खिचडी , शेवया इत्यादी पदार्थ असतात . मुलांसाठी हा दिवस खास असतो — कारण अनेक घरांत लहान मुलांना लाकडी बैलाचे खेळणे दिले जाते . ' तन्हा पोळा ' म्हणून दुसऱ्या दिवशी मुले हे खेळणे सजवून गावभर घेऊन फिरतात . पोळा सणाचे पुराणकाळापासून महत्त्व आहे . श्रीकृष्णाच्या गवळणारी जीवनशैलीत गोधनाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे . बैल हे केवळ शेतीचे सहकारी नव्हे, तर ते जीवनशैलीचे अविभाज्य घटक होते . त्यामुळे पोळा हा फक्त सण नसून , एक प्रकारचा बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सांस्कृतिक दिन आहे . पूर्वीच्या काळी यंत्रांचा अभाव होता , तेव्हा शेतीतील सर्व कामं बैलांवर अवलंबून होती . नांगरणीपासून वाहतुकीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर बैलांचे योगदान अमूल्य होते . आजही काही भागांत ते तितक्याच श्रद्धेने वापरले जातात .

सणाच्या दिवशी बैलांची पूजा केली जाते आणि विशेष मंत्र म्हणत बैलाला ओवाळले जाते . 'बैल माझा चांगला , मळ्यात नांगरतो ; पोळ्याला येता , माझं मन हरखतो ! ' अशा ओव्या गात गात बायका त्यांच्या कृतज्ञतेचे शब्द व्यक्त करतात . बैलांच्या गळ्यात लावलेल्या घंटा , पायातील तोडे , आणि मिरवणुकीतील ढोल-ताशांचे आवाज संपूर्ण गावात सणाचा आनंद निर्माण करतात . लोक एकमेकांच्या घरी जातात , एकत्र जेवतात , आणि बैलांच्या गोष्टी सांगतात . पोळा सण गावकरी , शेतकरी , महिला , आणि लहानग्यांना एकत्र आणणारा सण आहे .

आधी बैलांना स्नान घालणे , नैसर्गिक रंगांनी सजवणे , त्यांना विश्रांती व चांगले जेवण देणे यावर भर होता . पण आता काही ठिकाणी डीजे , लाऊडस्पीकर , नाच-गाणी , रासायनिक रंग, प्लास्टिक सजावट यामुळे सणाचा मूळ हेतू हरवतो आहे . तसेच शेतीत ट्रॅक्टर , यंत्रसामग्री वाढल्यामुळे बैलांचे महत्त्व कमी झाले आहे . त्यासाठी आपण प्रयत्न व उपाययोजना करायला हव्या जसे की बैलपोळा सण पारंपरिक व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा . बैलांच्या सजावटीसाठी नैसर्गिक रंग व साहित्य वापरावे .

मुलांना व तरुण पिढीला सणाचे खरे महत्त्व समजावून सांगावे . गावात सांस्कृतिक कार्यक्रम , पोवाडे , शेतकऱ्यांच्या कथा सांगून परंपरा जपावी . बैलपोळा सणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी परंपरा , पर्यावरण आणि संस्कृती यांचा सन्मान राखून सण साजरा करणे गरजेचे आहे .

आजच्या यांत्रिकीकरणाच्या युगात पोळ्याचे महत्त्व काहीसे बदलले असले तरीही या सणाचे संस्कृतीशील मूल्य टिकवले गेले आहे . शहरी भागातही शाळांमधून लाकडी बैल , चित्रकला स्पर्धा, ओवी गायन , प्रात्यक्षिके , आणि पर्यावरणपूरक बैल बनवण्याचे उपक्रम राबवले जातात . सोशल मिडियावरून माहिती दिली जाते . काही ठिकाणी 'इको-फ्रेंडली पोळा' साजरा केला जातो . या सणाद्वारे आपण निसर्ग , प्राणी , आणि शेती या तीनही घटकांना एकत्र बांधून ठेवणारा धागा जपतो . पोळा सण म्हणजे शेतकऱ्याचे आपल्या कामाच्या जोडीदाराबद्दलची कृतज्ञता , प्रेम , आणि आपुलकी व्यक्त करण्याचा दिवस . तो केवळ बैलांचा सण नाही , तर आपल्या संस्कृतीचा अभिमान आहे . म्हणूनच हा सण साजरा करताना प्रत्येकाने बैलांप्रती प्रेम , जपणूक आणि सन्मान जपावा . आजच्या पिढीनेही या सणाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे, कारण ही आपली माती , आपली संस्कृती आणि आपली ओळख आहे .

आपल्या बैलपोळा सणाची संस्कृती जतन करण्यासाठी काही गोष्टी करणे आवश्यक आहे :

१. पारंपरिक पद्धती जपणे : बैलांना रंग , फुले , गोंडे लावताना नैसर्गिक व सुरक्षित वस्तूंचा वापर करावा . बैलांना सजवताना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.
२. पिढ्यान् पिढ्या संस्कार देणे : लहान मुलांना बैलाचे महत्व , शेतकऱ्याचे श्रम व बैलपोळ्याची परंपरा याबद्दल सांगावे . शाळा , महाविद्यालयांमध्ये बैलपोळा विषयावर निबंध, नाटिका, चित्रकला स्पर्धा घेता येतात .
३. समाजातील सहभाग वाढवणे : गावागावांत बैलांची मिरवणूक , पारंपरिक खेळ व पोवाडे आयोजित करावेत . गावातील सर्वजण मिळून सण साजरा केल्यास एकतेची भावना वाढते .
४. आधुनिकतेसोबत जोडणे : मोबाईल , सोशल मीडियावरून बैलपोळ्याचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवावे . गावाची परंपरा दाखवणारे व्हिडिओ , माहितीपट तयार करून जतन करावेत .

बैलपोळा संस्कृती जतन करण्यासाठी परंपरा , शिक्षण , समाजसहभाग , आधुनिक माध्यमे आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन यांचा योग्य संगम करणे गरजेचे आहे .

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके ,**
**तहसीलदार , बीड**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com


# मंत्र्याने जरांगे पाटलांच्या कानात काय सांगितले? कुणाला आले टेन्शन? मोर्चापूर्वीच खळबळ?

मला सरकार म्हणाले की, तुझ्या अंगाचे कातडे काढून दे, मी तुमच्या समाजाला आरक्षण देतो, तर मी एका सेकंदात अंगाचे कातडे काढून देईल असे मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. येत्या २९ ऑगस्टला आपण मुंबईत येऊन मराठ्यांना आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही. कोण आडवे येते तर येऊ द्या असा निर्धार मनोज जरांगे यांनी व्यक्त केला आहे. जरांगे पाटील छत्रपती संभाजीनगर मधील झाल्टा गावात प्रत्यक्ष गाठी भेटीसाठी घेत आहेत. २९ ऑगस्टच्या मुंबई मोर्च्याच्या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील हा दौरा करीत आहेत. शेवटच्या उपोषणाला मुख्यमंत्री यांच्यावतीने सुरेश धस आले होते, आणि मला म्हणाले होते आताच सरकार स्थापन झाले आहे. त्यामुळे मी तीन महिन्यांच्या वेळ दिला होता. त्यामुळे मुंबईकरांनी सांगावे, चूक सरकारची आहे का आमची ? ५८ लाख मराठ्यांच्या कुणबी नोंदी आहेत.आता सरकारला काय पुरावा पाहिजे. आता प्रश्न आहे, आम्ही तुमचे का ऐकावे ? आणि आम्ही मुबई मध्ये का येऊ नये ? यांना वेळ द्यायचा तरी किती, प्रत्येक वेळी वेळ दिला आहे.



हैदराबाद गॅझेटसाठी वेळ दिला आहे. काय व्हायचे ते होऊ द्या मी मुबईमध्ये घुसणार. आम्ही कोणाचे आरक्षण मागत नाही,आमचे आम्हाला आरक्षण द्या असेही ते यावेळी म्हणाले. आता आपण ठरवायचे लेकरांचे वाटोळे होऊ द्यायचे का आरक्षण आणायचे ? बीड जिल्ह्याच्या एका माजी मंत्र्यांच्या मुलाचा पेपर होता पण तो दोन टक्क्यांनी हुकला, आरक्षण श्रीमंत गरीब बघत नाही असे जरांगे यावेळी म्हणाले. सामना आणि संघर्ष जसा असेल तसा करावा लागतो. मराठ्यांवर गुलाल उधलायची हीच वेळ आहे. मराठ्यांनी सरकारला शांततेत समजून सांगितले. माझ्या समाजाला कोणी वाईट बोलले तर घोडे लावणार. सरकार उलट्या खोपडीचे असेल तर मी पण उलट्या खोपडीचा आहे.त्या येवल्यावाल्यानी समजून घेतले पाहिजे मराठे आरक्षणात गेले अशी भुजबळ यांचे नाव न घेता जरांगे यांनी टीका केली. ज्या दिवशी आपण संयम आणि इमानदारीच्या यादीत येऊ, त्यावेळी मराठ्यांकडे कोणी वाकडे बघणार नाही. वेळ अजून हातातील गेली नाही, संधीचे सोने करा. मी सर्व पक्षातील लोकांना, आमदार, खासदार यांना विनंती करतो, माझ्या लेकरांच्या पाठीवर हात ठेवा, सर्वांना आवाहन आहे आणि समाजाच्या लेकरांकडे कोणी वाकड्या नजरेने पाहिले तर रस्त्यावर फिरू देणार नाही अशा इशाराही मनोज जरांगे यांनी यावेळी दिला.

# सुबक कळ्यांचा पहिला मोदक साचा

मुंबई:- गणेशोत्सव, उकडीच्या मोदकांशिवाय पूर्ण होतो का? मात्र हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात, प्रत्येक गृहिणीला सुबक मोदक बनवायला वेळ मिळतोच असे नाही. याच अडचणीवर मात करण्यासाठी मालवणच्या सुशांत सावंत यांनी खास साचा तयार केला आहे, जो कोणालाही सुंदर कळ्यांचे उकडीचे मोदक सहज तयार करता येतील.या साचाची किंमत ९९ रुपये असून ऑनलाईन खरेदी वर या साच्याची किंमत ही १९९ आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन खरेदीला ग्राहकाचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. साच्याचे वैशिष्ट्,हा साचा इतका अद्वितीय आहे की कोणतीही व्यक्ती अगदी नवशिके देखील याच्या सहाय्याने सुंदर कळ्यांचे उकडीचे मोदक तयार करू शकतात. विशेष म्हणजे या साचातून मोदकाबरोबरच मोमोजसुद्धा बनवता येतात. दोन वर्षांचा सातत्यपूर्ण प्रयत्न, सुशांत आणि त्यांच्या पत्नीने तब्बल दोन वर्षे हा साचा परिपूर्ण करण्यासाठी मेहनत घेतली. सुरुवातीला अनेक डिझाइन्स फेल झाले. कधी कळ्या नीट यायच्या नाहीत, तर कधी सारण व्यवस्थित भरले जात नव्हते. पण सातत्याने सुधारणा करत शेवटी त्यांनी एक असा साचा तयार केला, ज्यातून सुंदर कळ्यांचे, सुबक आणि खमंग मोदक अगदी सहज तयार होतात. उत्पादन ते विक्री एक नवा प्रवास, साचा तयार झाल्यानंतर ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी त्यांनी ॲमेझॉन, फ्लिपकार्टसारख्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून विक्री सुरू केली. मात्र उत्पादनाची वैशिष्ट्ये ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी काही मराठी यूट्युबर्सची मदत घेतली. या यूट्युबर्सनी व्हिडीओच्या माध्यमातून साच्याचा उपयोग, मोदकाचे पीठ कसे मळायचे, हे सर्व समजावून सांगितले. या प्रयत्नांना गृहिणींकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. ग्राहकांचा प्रतिक्रिया,सुरुवातीला काही ग्राहकांनी साच्यातून हव्या तशा कळ्या येत नसल्याची तक्रार केली, पण त्याचवेळी अनेकांनी मोदक अगदी सुंदर तयार झाल्याचे समाधानाने सांगितले. यामागील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मोदकासाठी योग्य पीठ कसे मळावे हे जाणणे आवश्यक आहे. याच उद्देशाने यूट्युब व्हिडीओमध्ये पीठ मळण्याची योग्य पद्धत समजावून सांगण्यात आली आहे. विवाहानंतर पत्नीला मोदक साच्याच्या मदतीने सुबक मोदक बनवता येत नसल्याचा अनुभव घेतल्यानंतर स्वतःच साचा तयार करण्याचा निर्णय घेतला. आज अनेक गृहिणी या साच्याचा उपयोग करून सुबक आणि मनोहारी मोदक तयार करत आहेत. सुंदर मोदक पाहून त्याच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंदच आमच्यासाठी सर्वात मोठं यश आहे.

## विविध सामाजिक उपक्रम राबवत होणार गणेशाची स्थापना

प्रतीनिधी! आकाश सोनवणे गेवराई तालुक्यातील प्रसिद्ध असे धार्मिक क्षेत्रातील गाव मौजे मारोतीचे (ठाकर) आडगाव येथे यंदा धार्मिक वातावरणात स्थापना होणार आहे व नवनविन संकल्पना पुर्णत्वास येत आहे गावातील काही तरुण मंडळी यांनी प्रथमच पुढाकार घेत बाप्पा विराजमान होण्याची संकल्पना रुजवत आहेत छत्रपती शिवराजे गणेश मंडळांच्या तर्फे यंदा सामाजिक, शैक्षणिक बाबींवर प्रभुत्व पडणार आहे यामध्ये अध्यक्ष बालाजी कोकाट, उपाध्यक्ष वैभव जाधव, सचिव विकास सोनवणे, खजिनदार वैभव उबाळे यांची निवड करण्यात आली. गेल्या आडोतीस व अधिक वर्षांची परंपरा असलेल्या शिवराजे गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी आकर्षक विद्युत रोषणाई, देखावा केला जातो. सोबत विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवले जातात. या वर्षी श्री गणेश मुर्ती हि भव्य दिव्य देखाव्यात असणार आहे, व आकर्षक विद्युत रोषणाई सोबतच विविध आरोग्यविषयक उपक्रम, बाल गट व शिशु गटासाठी चित्रकला, रांगोळी, इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. ठाकर आडगांव वासियांनी या सांस्कृतिक, अध्यात्मिक, धार्मिक उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन शिवराजे गणेश मंडळ समितीतर्फे करण्यात आले.

## बकरवाडी येथे बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकारातून मोफत छत्री वाटप



बकरवाडी (ता. जि. बीड), दि. १७ ऑगस्ट २०२५: युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव (दादा) चव्हाण यांच्या पुढाकारातून बकरवाडी येथे मोफत शिवसेना छत्री वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे उद्घाटन गोरक्षनाथ टेकडी संस्थानचे ह.भ.प. नवनाथ बाबा महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आले.गावातील नागरिकांना उन्हाळी व पावसाळी दिवसांत उपयोगी पडाव्यात या उद्देशाने मोफत छत्र्यांचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, अनेकांनी बाजीराव दादा चव्हाण यांच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक केले.कार्यक्रमावेळी बाजीराव दादा चव्हाण मित्र परिवारातील सचिन गाडे, गणेश गाडे, लिंबराज गाडे, भिमाशंकर काळे, दिनकर गाडे, गणेश काळे, अशोक गाडे, दत्ता गाडे, ज्योतीराम गाडे, विजय काळे, राम गाडे, विशाल गाडे, दत्ता काळे, दिपक काळे, महादेव गाडे, दशरथ गाडे, गोविंद गाडे, किशोर काळे, दत्ता जाधव, विठ्ठल काळे यांच्यासह गावातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयाबीन पाण्याखाली शेतकरी आर्थिक संकटात

## पंचनामे करून नुकसानभरपाईची लिंबागणेश येथील शेतकऱ्यांची मागणी – डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश : (दि.१९)गेल्या ३-४ दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील फुलोऱ्यापासून शेंगा लागण्याच्या अवस्थेत असलेले सोयाबीन, मुग, उडीद आदी पिके पाण्याखाली गेली आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक वाया जाण्याची भीती आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे, रामचंद्र मुळे, रामदास मुळे, अभिजित गायकवाड, जितेंद्र निर्मळ, बाबु आण्णा वायभट, राजेभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ, चिंतामण गिरे, अक्षय वायभट आदींनी केली आहे.
"सोयाबीनला बुरशी लागली; पिक वाया" – रामकिसन गिरे



सलग पावसामुळे सोयाबीनमध्ये पाणी साचल्याने मुळांना बुरशी लागली आहे. मुळांना गाठी येऊन वाढ खुंटली असून पिक वाया गेले आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे यांनी केली.

दरम्यान, रामचंद्र मुळे यांनी मागील २-३ वर्षांपासून शासन पंचनामे करूनही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई न मिळाल्याचे सांगितले.
ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी" – डॉ.गणेश ढवळे
बीड जिल्ह्यातील बहुतांश गावांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक पूर्णपणे वाया गेले आहे. शासनाने पंचनाम्याचे आदेश दिले तरी ते प्रत्यक्षात होत नसल्याचे दिसून येते. शेतकरी आर्थिक संकटात सापडले असल्याने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# पिकासाठी लावलेला करंट ठरला काळ; शेतात गेलेल्या महिलेचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी अंत

प्रतिनिधी आडूळ (पैठण) : पैठण तालुक्यातील दरेगाव येथे एक अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावणारी घटना घडली आहे. वन्यप्राण्यांपासून मक्याच्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी लावलेल्या तारेच्या कुंपणातील विजेच्या प्रवाहाचा धक्का लागून एका २५ वर्षीय तरुण विवाहितेचा जागीच मृत्यू झाला. लक्ष्मी सखाराम मैद असे मृत महिलेचे नाव असून, ही घटना सोमवारी (दि. १८) सकाळी घडली. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. नेमके काय घडले? आडूळ आणि परिसरातील शेतकरी सध्या वन्यप्राण्यांच्या उपद्रवाने त्रस्त झाले आहेत. रानडुक्कर, हरीण आणि इतर प्राणी शेतातील उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी करत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. याच समस्येला कंटाळून दरेगाव शिवारातील गट क्रमांक ९४ मधील शेतकरी रुखमण रामकिसन मैद यांनी आपल्या मक्याच्या पिकाला संरक्षण मिळावे,



यासाठी शेताच्या बांधावर तारेचे कुंपण करून त्यात विजेचा प्रवाह सोडला होता. रविवारी रात्री शेतकऱ्याने कुंपणाला करंट जोडून ठेवले होते. सोमवारी सकाळी ७:३५ वाजता महावितरणचा वीजपुरवठा सुरू झाला आणि तारेच्या कुंपणात वीजप्रवाह उतरला. सकाळी ८:३० च्या सुमारास त्याच परिसरातील लक्ष्मी सखाराम मैद (वय २५) या प्रातर्विधीसाठी शेताकडे गेल्या असता, त्यांचा नकळतपणे या जिवंत तारेला स्पर्श झाला. रविवारी मध्यरात्रीपासून परिसरात रिमझिम पाऊस सुरू असल्याने जमिनीत ओलावा होता. त्यामुळे विजेचा धक्का इतका तीव्र होता की, लक्ष्मी यांचा जागीच मृत्यू झाला. परिसरात हळहळ, कुटुंबावर दुःखाचा डोंगर घटनेनंतर आरडाओरड होताच गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. लक्ष्मी यांना तातडीने पैठण येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सायंकाळी ५ वाजता दरेगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, सासू-सासरे असा परिवार आहे. या घटनेमुळे वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव आणि त्यातून शेतकऱ्यांनी उचललेली धोकादायक पावले, हा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पिकांचे संरक्षण करताना मानवी जीव गमावला जाण्याची ही घटना अत्यंत वेदनादायी असून, प्रशासनाने यावर तातडीने सुरक्षित उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## काटा गावातील नुकसानीचे पंचनामे करून मदतीची मागणी



प्रतिनिधी वाशीम जिल्ह्यातील काटा या गावी १६ऑगस्ट रोजी झालेल्या ढगफुटीमुळे प्रचंड हाहाकार उडाला आहे नद्या नाल्यांना पूर आल्यामुळे पाणी शेतात घुसल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या निसर्ग प्रकोपामुळे शेतकरी वर्ग पूर्ण हतबल झाला आहे त्यामुळे प्रशासनाणे ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी काटा गावातील समाजसेवक इस्माईलखान पठाण यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारा केली आहे गावातील शेतकऱ्यांचे जगणे केवळ खरीप पिकावर असून सर्व पीक पाण्यात गेल्या मुले जगाव की मरावं असा प्रश्न काटा गावातील जनतेसमोर निर्माण झाला या गावात मका, हळद, सोयाबीन, ऊस, मूग उडीद फळबाग आणि भाजीपाला यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे भविष्यात उपजीविका कशी करावी असा सवाल निर्माण झाला तसेच शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज, वाढत्या महागाईत आता जगाव कस हा एकच सवाल यक्ष मनून उभा आहे तरी शेतकरी हा आत्महत्या करण्याच्या उंभरवठ्यार आहे अशा प्रकारची ठाम भूमिका इस्माईलखान पठाण यांनी मांडली आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com